# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १६/०९/२०२४ (सोमवार) सायंकाळ**

---

## प्राणांतिक अपघात

### अपघात करून वाहनासह पळुन जाणाऱ्या अज्ञात आरोपीचा एमआयडीसी बोरी पोलीसांनी शोध घेतला

पोस्टे एमआयडीसी बोरी अंतर्गत टाकळघाट येथे पिवळया रंगाची कॅबीन असलेला टिप्परचे अज्ञात वाहन चालकाने आपले वाहन भरभाव वेगान व निष्काळजीपणे चालवुन पायदळ चालत असणा—या अनोळखी ईसमास धडक दिल्याने त्याचा जागीच मुत्यु झाला. मृतक यास धडक मारून आरोपी घटनास्थळाहुन वाहनासह पळुन गेला होता. फिर्यादी नामे— विलास हरीभाउ डायरे (पोलीस पाटील) वय ४४ वर्ष रा. टाकळघाट जि. नागपुर यांचे रीपोर्ट वरून पोस्टे एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरूद्ध कलम २८१, १०६(१) भा.न्या. संहीता १८४, १३४, १७७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

पोस्टे एमआयडीसी बोरी येथील तपासी अधिकारी आणि डी बी पथक यांनी गुप्त बातमीदाराच्या मदतीने अज्ञात आरोपीचा आणि अज्ञात मृतकाचा शोध घेतला. त्यावरून अशी माहिती मिळाली की, दिनांक १५/०९/२०२४ चे १८.४५ वा. ते १९.०६ पावतो यातील टिप्पर क्र. एम एच—४०/एके— ७२१० चा चालक **आरोपी नामे— कृष्णकुमार छन्नू वर्मा, वय ३१ वर्ष रा. जवादे लेआउट बुट्टीबोरी जिल्हा नागपूर** याने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन पायदळ चालणाऱ्या **मृतक नामे— नीरज कुमार उपेंद्र प्रसाद सिंह वय ३४ वर्ष रा. टाकळघाट बस स्टॉप जवळ टाकळघाट** यास जोरदार धडक मारून मृतकाचे अंगावरून टिप्परचे चाक गेल्यामुळे मृतकाचा चेहरा, डोके, पाय, पोट, छाती सर्व चेंदामेंदा झाल्याने मृतकाचे जागीच मरणास आरोपी टिप्पर चालक हा कारणीभूत झाला. अशी माहिती मिळाली.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे एमआयडीसी बोरी येथील ठाणेदार पोनि सतिशसिंग राजपूत, सपोनि विठ्ठल मोरे, डीबी पथकाचे पोउपनि जोसना गिरी, पोहवा लक्ष्मण बन्ने, पोअं. पुजा इंगळे यांनी पार पाडली.

# <u>अकस्मात मृत्यु</u>

१) पोस्टे काटोल अंतर्गत धर्ती मुर्ती रोड महेश्वरी भवन जवळ रेल्वे लाईन काटोल येथे दि. १५/९/२०२४ चे ८/०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– अमोल दादाराव पाटील वय ३० वर्ष रा. नायगाव चिचाळ ता. काटोल याचा लहान भाऊ **मृतक नामे– अमोल दादाराव पाटील** हा चहाची टपरी उघडण्याकरिता काटोल येथे ८.०० वा. दरम्यान घरून काटोल करिता निघुन गेला होता फिर्यादी सावनेर येथे हजर असता फिर्यादीचे मित्र मिथुन याचा फोन आला व तो सांगु लागला कि तुझ्या भावासारखा एक इसम मला धर्ती मुर्ती रोड महेश्वरी भवन जवळ रेल्वे लाईन काटोल येथे कटुन पडलेला दिसत आहे असे सांगितले वरून फिर्यादीने त्याला व्हॉटसअॅप वर फोटो पाठविण्या करिता सांगितले असता त्याने फोटो पाठविल्यावर फिर्यादीने ते फोटो पाहील्यावर तो फिर्यादीचा लहान भाऊ दिसला त्यामुळे फिर्यादीने सावनेर वरून काटोल येथे रेल्वे पटरीवर जावुन पाहीले असता फिर्यादीला त्याचा भाऊ हा रक्तबंबाळ स्थीतीत पडलेला व त्याचे कमरेपासुन दोन भाग वेगवेगळे झाले दिसुन आले व तो मरन पावला होता.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे काटोल येथे कलम १९४ बि.एन.एस अन्वये मर्ग दाखल करण्यात आला असुन गुन्हयाचा पुढील तपास मपोहवा सुनिता साठोने या करीत आहे.

२) पोस्टे अरोली अंतर्गत अडेगांव ता मौदा येथे दिनांक १५/०९/२०२४ रोजी चे १८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– हरसू अरूण टेंभूर्णे रा. अडेगांव ता मौदा याचे वडील **मृतक नामे– अरुन संपत टेभुर्ने वय ७२ वर्ष रा. अडेगाव ता. मौदा जि. नागपुर** हे म्हातारे झाले असल्याने त्यांना गुडघ्याचा खुप त्रास होता व त्यांचे डोळयांना पण बरोबर दिसत नव्हते या त्रासाला कंटाळुन त्यांनी घराचे मागील सरकारी विहीरीचे पाण्यात उडी मारुन आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे अरोली येथे कलम १९४ बि.एन.एस अन्वये मर्ग दाखल करण्यात आला असुन गुन्हयाचा पुढील तपास पोहवा शंकर मडावी हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर